महाराष्ट्र शासन
**शासकीय तंत्रनिकेतन, मिरज**
माजी सैनिक वसाहत जवळ, विद्यानगर, मिरज- ४१६४१०दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३)२२३१४२३,

जा.क्र.:-शांतनिमि/वि वि/उ.प.२०२० / 1312 दिनांक :- 9 SEP 2020

**परीपत्रक :-**

**विषय :-अंतिम सत्र /वर्षातील तसेच अंतिम सत्र वर्षातील निम्नसत्र / वर्षाचे बॅकलॉग विषया करीता उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज भरण्याकरीता एक विषेश संधी देणे बाबत...**

**संदर्भ:-मा.प्र.सचिव म.रा.तं.शि.मडळ ,मुंबई यांच्या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिम/ का-४०/उ.प.२०२०/ परीक्षाअर्ज /०५७ दिनांक ०९/०९/२०२०**

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरु झालेली असून, संदर्भाधीन विषयाअन्वये विहीत मुदतीत अर्ज न भरु शकलेल्या विद्यार्थ्यांकरीता एक विषेश संधी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

उन्हाळी परीक्षा २०२०परीक्षा अर्ज भरणयाची ही शेवटची संधी असुन या नंतर कुठल्याही सबबीमुळे (कारणाने) कोणालाही परीक्षा अर्ज भरता येणार नाही याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

त्याचे वेळा पत्रक सोबत जोडलेल्या संदर्भीय परीपत्रकात दिलेले आहे. विदयार्थ्यांनी त्यांचे परीक्षा अर्ज ऑनलाईन पदधतीने भरुन त्याच्या प्रतीसह विहीत परीक्षा शुल्क भरुन संदर्भीय परीपत्रकात दिलेल्या वेळा पत्रकानुसार विदयार्थी विभागात जमा करावेत. विहीत मुदतीत विदयार्थ्यांनी त्यांचे परीक्षा अर्ज जमा केले नाहीत, तर होणाऱ्या नुकसानीस ते स्वत: जबाबदार राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

संदर्भिय परीपत्रक सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणुन द्यावे जेणे करुन कोणताही विद्यार्थी परीक्षेस बसण्या करीता वंचित रहाणार नाही.

(कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,मिरज.

प्रति:- सर्व विभाग प्रमुख यांनी आपल्या विभागातील विद्यार्थ्यांना सदर परीपत्रक निदर्शनास आणुन दयावे. माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत:- १)मुख्य नोटीस बोर्ड
२) श्री. काळे एस.पी. प्रोग्रॅमर यांना संस्थेच्या वेबसाईट वर टाकणे करीता.

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी क्र. ०२२-६२५४२११०/१८८/१३२

Email: secretary@msbte.com Web : www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४३/उ.प.२०२०/परीक्षा अर्ज/२०२०/०५८ दिनांक – 9 SEP 2020

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नित संस्था

**विषय: अंतिम सत्र/ वर्षातील तसेच अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्न सत्र/ वर्षाचे बॅकलॉग विषयाकरिता उन्हाळी परिक्षा-२०२० चे परिक्षा अर्ज भरण्याकरीता एक विशेष संधी देणेबाबत**

संदर्भ: मंडळाचे महत्त्वाचे परीपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा)/उ. प.२०२०/परीक्षा अर्ज/०४१, दि. १०/०६/२०२०

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार विहीत मुदतीत उन्हाळी – २०२० चे परीक्षा अर्ज भरले नाहीत अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याची एक संधी देण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या प्राप्त विनंतीनुसार अंतिम सत्र / वर्षातील तसेच अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्न सत्र / वर्षाचे बॅकलॉग विषयांकरीता परीक्षा अर्ज भरण्यासाठीची विशेष संधी देण्यात येत आहे. त्यांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | प्रकिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी Login मधून परीक्षा अर्ज भरणे | दि. १०/०९/२०२० ते दि. ११/०९/२०२० |
| २ | विद्यार्थ्यांनी भरलेले / संस्थेमधून भरलेले परीक्षा अर्ज संस्थेने Institute Login मधून कन्फर्म करणे | दि. १०/०९/२०२० ते दि. १३/०९/२०२० |
| ३ | विभागीय कार्यालयांनी संस्थांनी कन्फर्म केलेले परीक्षा अर्ज निश्चित करणे | दि. ११/०९/२०२० ते दि. १४/०९/२०२० |
| ४ | विभागीय कार्यालयांमार्फत परीक्षा अर्ज निश्चित करण्याची अंतिम तारीख | दि. १४/०९/२०२० |

अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थांनी उन्हाळी – २०२० परीक्षेचे अर्ज विहीत कालावधीत भरून परीक्षेचे शुल्क आपल्या संस्थेशी संपर्क साधून ऑनलाईन पद्धतीने अथवा प्रचलित पद्धतीने संस्थेस अदा करावे व संस्थेमार्फत परीक्षा अर्ज निश्चित केला असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच संस्थांनी सुद्धा विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज व प्राप्त परीक्षा शुल्क तपासून विहीत कालावधीत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निश्चित करावेत. तदनंतर विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क ऑनलाईन द्वारे अदा करावे व संस्थास्तरावर निश्चित करण्यात आलेले सर्व परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयाने निश्चित केल्याची खात्री करून घ्यावी. तसेच संबंधित विद्यार्थाचे परीक्षा अर्ज भरून घेतल्याबाबतचे हमीपत्र संस्थेच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने ईमेलद्वारे विभागीय कार्यालयास देण्यात यावेत.

तरी सर्व प्राचार्यांनी आपल्या संस्थेतील उन्हाळी – २०२० परीक्षेकरीता अंतिम सत्र / वर्षातील तसेच अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्न सत्र / वर्षाचे बॅकलॉग विषयांचे परीक्षा अर्ज विहीत मुदतीत न भरलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याबाबतचे वेळापत्रक अवगत करून त्यांचे उन्हाळी – २०२० परीक्षेकरीताचे परीक्षा अर्ज विहीत कालावधीत भरले जातील, याची दक्षता घ्यावी.

विरजाधव

(वि. र. जाधव)

प्र. सचिव

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहीतीसाठी:

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहीती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:

उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद